# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४, E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in, Web : www.ropune.org.in


***तत्काळ / ई मेल द्वारे***

*जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/सुनिवे/२०१९/ ८५२* दिनांक : 18 FEB 2019

*प्रति,*

*उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, वि. का., पुणे.*
*संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.*
*प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी.*
*प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड.*
*प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड.*
*प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे / कराड / सोलापूर / कोल्हापूर / मिरज / अवसरी.*
*प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे.*
*प्राचार्य, शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन, तासगांव.*
*प्राचार्य, म.रा. इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅने. अँड केट. टेक्नॉ., पुणे.*

***विषय : महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९.***

*संदर्भ : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसूचना क्रमांक वेपुर २०१९/प्र. क्र. १/सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९.*

*संदर्भित अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन), नियम २०१९ पारीत करण्यात आलेले असून ते दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून अंमलात आले आहेत असे मानण्यात आले आहे. या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाचा वेतन स्तर त्या पदासमोर स्तंभ (५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. तसेच सदर अधिसूचनेतील मुद्दा क्रमांक ७ (अ) (१) नुसार दिनांक ०१/०१/२०१६ लगतपूर्वीच्या मूळ वेतनास २.५७ ने गुणून पूर्णांकित केलेली रक्कम संबंधित सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये अनुज्ञेय वेतन स्तरामधील सेलमध्ये असल्यास ती रक्कम सुधारित वेतन ठरेल, जर ती रक्कम अनुज्ञेय वेतन स्तरावरील सेलमध्ये नसेल तर सदर पूर्णांकित रक्कमेच्या लगतच्या पुढील सेलमधील रक्कम सुधारित वेतन ठरेल असे नमूद केले आहे.*

*याबाबत कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील / कार्यालयातील ज्या गट ब ते गट ड मधील अधिकारी / कर्मचा-यांना नियमित पदोन्नती / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळाल्यानंतर त्याचे ग्रेड वेतनामध्ये वाढ झालेली आहे, तथापि सदरच्या अधिसूचनेमधील वेतन मॅट्रिक्समध्ये सदर ग्रेड वेतनाचा स्तंभ उपलब्ध नसल्याने, अथवा अधिसूचनेमधील वेतन मॅट्रिक्समध्ये ज्या पदांचा ग्रेड वेतनाचा स्तंभ उपलब्ध अशा पदांवरील कार्यरत कर्मचा-यांचे सुधारित वेतन निश्चिती करता येणे शक्य होत नाही. अशा पदांबाबतची सविस्तर माहिती या कार्यालयाच्या* est.ropune@gmail.com *या ई मेल ॲड्रेसवर* ***दिनांक २०/०२/२०१९ पर्यंत*** *सादर करावी, जेणेकरुन सदरच्या अधिसूचनेमध्ये संबंधित पदांच्या ग्रेड वेतनाचा समावेश करणेबाबत शासनास विनंती करण्यात येईल.*

*(डॉ. दि. रा. नंदनवार)*
*प्र .सहसंचालक,*
*तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.*

*प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र सहपत्रांसह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी व ई मेलद्वारे पाठविण्यासाठी रवाना.*